**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय**
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

जा.क्र./ल. ले/कक्ष-1/ 186 /सन 2023 - 24 दिनांक: 27.07.2023

## // परिपत्रक //

**विषय : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तसेच कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती संबंधित प्राप्त तक्रारींकरिता उपलब्ध करण्यात आलेला दूरध्वनी क्रमांक प्रसिध्द करणेबाबत.**

राज्यातील कांदळवन क्षेत्र असलेल्या 7 सागरी जिल्ह्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तसेच कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीकडे प्राप्त होणाऱ्या कांदळवन / पाणथळ क्षेत्राच्या ऱ्हासाबाबतच्या तक्रारी दूरध्वनीद्वारे प्राप्त करण्याकरीता समिती स्तरावर नागरिकांसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत निर्देश प्राप्त झालेले आहेत.

त्याअनुषंगाने कांदळवन तसेच पाणथळ समिती संबंधित प्राप्त तक्रारींकरिता कांदळवन कक्षामार्फत कांदळवन कक्ष यांचे कार्यालय, मुंबई येथे दूरध्वनी क्रमांक 022-22691349 कार्यालयीन वेळेत टोल फ्री क्रमांक म्हणून कार्यान्वित करणेत येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

**(एस.व्ही.रामाराव)**
**सह-अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष**